CMYK

लोणार धारातीर्थ भाविकांच्या अंघोळीसाठी, कावड जलस्त्रोतासाठी खुले करावे >>पान 2

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या >>पान 3

पिंपरी फॉरेस्ट येथील जुगार अड्ड्यावर धाड, ८.५ लाखांचा मुद्देमाल जप्त : ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल >>पान 4


**सुविचार**
नेहमी धैर्याने आणि विश्वासाने काम करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 12 ■ गुरूवार, दि. 31 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


द राजा साबच्या निर्मात्यांनी पोस्टर शेअर करुन संजय दत्तला दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

आतील पान

**शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाचा वाद**

## निर्णय आणखी पुढे जाण्याची शक्यता वाढली; आता 10 सप्टेंबर नंतरच निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी : शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालय २० ऑगस्ट रोजी अंतिम फैसला देणार होतं. मात्र, पुन्हा एकदा तारीख ते तारीख प्राप्त झाली आहे. राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या वादामध्ये राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे मागितलेल्या सल्ल्यावर उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून घटनापीठाची स्थापना करण्यात आली आहे. हे घटनापीठ राष्ट्रपतींनी मागितलेल्या सल्ल्यांवर १९ ऑगस्टपासून सुनावणी सुरू करणार आहे. या घटनापीठाचे न्यायमूर्ती सूर्यकांत सुद्धा भाग असणार आहेत. त्यामुळे शिवसेना वादाचा फैसला आणखी काही दिवस पुढे जाण्याची शक्यता आहे.**



न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोरच शिवसेना चिन्हाचा आणि पक्षाचा अंतिम फैसला होणार आहे. त्यामुळे सूर्यकांत घटनापीठाचे सदस्य असल्याने शिवसेना सुनावणी लांबणीवर पडली आहे. घटनापीठाची सुनावणी १९ ऑगस्टपासून ते १० सप्टेंबरपर्यंत होणार असल्याने शिवसेना प्रकरणावर कोणताही निर्णय घेण्याची शक्यता कमी असून त्यानंतर निर्णय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता शिवसेना चिन्ह आणि नावाच्या वादावर १५ सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये निर्णय होण्याची शक्यता आहे. कदाचित १५ सप्टेंबरनंतर अंतिम तारीख निश्रि्चत होऊन किंवा ऑक्टोबरमध्येच हे प्रकरण खंडपीठासमोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष कोणाची याची उत्सुकता अवघ्या काही दिवसांवर आली असताना पुन्हा एकदा तारीख पे तारीख भेटली आहे.

काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाकडून या प्रकरणाची तातडीने सुनावणी होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयामध्ये विनंती करण्यात आली होती. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत, त्यामुळे आम्ही एकदाच काय ते या प्रकरणावर निकाल देऊ असं म्हणत हे प्रकरण लवकरात लवकर संपवणार असल्याचे म्हटलं होतं. त्यानंतर २० ऑगस्ट तारीख सुद्धा निश्रि्चत करण्यात आली होती. आता तारीख पे तारीख झाल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावरच शिवसेना पक्ष चिन्हाचा अंतिम फैसला समोर येण्याची शक्यता आहे.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या भूमिकेमुळे एसटी महामंडळाचे १२ कोटी रुपये वाचणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दाखवलेला व्यवसायिक दृष्टिकोन आणि योग्य वेळी घेतलेल्या भूमिकेमुळे एसटी महामंडळाची दरवर्षी तब्बल १२ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

येत्या १ ऑगस्ट पासून इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांनी एसटी महामंडळाला पुरवण्यात येणाऱ्या डिझेल इंधनावरील देण्यात येणाऱ्या सवलत दरात ( ) प्रति लिटर ३० पैशाची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दिवसाला सरासरी ३ लाख २३ हजार रुपये याप्रमाणे वर्षाला अंदाजे ११ कोटी ८० लाख रुपये इतकी बचत होणार आहे.

गेली ७० वर्षापेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या कडून डिझेल इंधन खरेदी करत आहे. सध्या दररोज एसटी महामंडळाला सरासरी १०. ७७ लाख लिटर डिझेल लागते. एसटी महामंडळ हे या कंपन्यांचा मोठा खरेदी ग्राहक ( ) असल्यामुळे संबंधित कंपन्या महामंडळाला प्रति लिटर सवलत देत होत्या. परंतु एसटी महामंडळाने वारंवार विनंती करूनही कित्येक वर्ष या कंपन्यांनी सवलत दरात बदल केला नव्हता. तथापि, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे संबंधित कंपन्यांनी सवलत दरामध्ये वाढ करण्याची भूमिका घेतली. त्यासाठी इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मंत्री श्री. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात तीन-चार बैठका घेण्यात आल्या. तसेच डिझेल इंधन पुरवठा करणाऱ्या इतर खासगी कंपन्या सोबत देखील वाटाघाटी करण्यात आल्या. एवढेच नव्हे तर स्पर्धात्मक स्तरावर निविदा काढण्याची प्रक्रिया देखील राबवण्याची तयारी ठेवली.

या सर्वांचा परिणाम म्हणजे संबंधित कंपन्यांनी सवलत दरात वाढ करण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार यत्या १ ऑगस्ट पासून मुळ सवलत दरात प्रति लिटर ३० पैसे वाढ करण्याचे संबंधित कंपन्यांनी मान्य केले आहे. सध्या एसटीच्या २५१ आगारात असलेल्या पेट्रोल पंपाच्या सहाय्याने दररोज सरासरी १०.७७ लाख लिटर डिझेल इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या कडून



पुरविण्यात येते. भविष्यात वाढत्या बसेसच्या संख्येमुळे डिझेल इंधनाची खपत देखील वाढणार आहे. त्यामुळे प्रति लिटर ३० पैसे वाढीव सवलत दिल्यामुळे वर्षाकाठी एसटी महामंडळाची अंदाजे १२ कोटी रुपयांची अतिरिक्त बचत होणार आहे.

"एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्या, ज्या ठिकाणी पैशाची बचत आणि काटकसर करणे शक्य आहे, त्या त्या ठिकाणी बचत आणि काटकसर केली पाहिजे. तसेच तिकीट विक्रीच्या व्यतिरिक्त उत्पन्नाचे इतर स्त्रोत देखील निर्माण करणे गरजेचे आहे. अर्थात, या दोन्ही प्रयत्नातून भविष्यात एस टी महामंडळ आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

## अपात्र बहिणींचे खापर एकनाथ शिंदेवर ?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** 'मुख्यमंत्री लाडकी बहीण ' योजनेतील अपात्र बहिणी व पुरुषांनीही लाभ घेतल्याचे उघडकीस आल्याने आणि सरकारला सुमारे ४८०० कोटी रुपयांचा फटका बसल्याने ही जबाबदारी कोणाची, हा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणतीही छाननी न करता विधानसभा निवडणुकीत लाभ उठविण्यासाठी घाईघाईने मानधन वाटप करण्याचे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याने हे खापर त्यांच्या माथी मारले जाण्याची शक्यता आहे. अपात्र लाभार्थ्यांकडून मानधन वसुलीवरून महायुती सरकारमध्ये गोंधळ आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळून महायुती सरकार सत्तेवर आले आणि या योजनेचे राजकीय श्रेय शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या तिघांनीही घेतले आहे.

## केंद्रीय विद्यालयाच्या नूतन इमारतीचे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याहस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन

### विविध मान्यवरांची उपस्थिती : ९ एकर क्षेत्रावर इमारतीची उभारणी

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात मोठी भर घालणाऱ्या येथील पी.एम. श्री केंद्रीय विद्यालय नव्याने बांधलेल्या भव्य इमारतीचे उद्घाटन २९ जुलै रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. देशभरातील एकूण २८ नव्याने उभारलेल्या पी.एम. श्री शाळांमध्ये वाशीमच्या शाळेचाही समावेश असून, आज या सर्व शाळा राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या.

या उद्घाटनप्रसंगी वाशीम येथील सिव्हिल लाईन्स परिसरात पार पडलेल्या स्थानिक कार्यक्रमाला निवासी जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, शिक्षण अधिकारी मंगल धुपे, जिल्हा पुरवठा अधिकारी दादासाहेब दराडे, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य अतुल मुल, राजस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य झंवर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अतिश देशमुख, योगिता पराग सरनाईक, स्टेट बँक ऑफ इंडियाचे बँक मॅनेजर कुमार मोहित, श्रीनिवास व्यास, जवाहर नवोदय विद्यालयाचे उपप्राचार्य सुभाष लष्करी, प्लांटेशन ऑफिसर समाधान सानप, युनियन बँक ऑफ इंडिया वाशीमचे शाखा व्यवस्थापक अमित पंचबुद्धे तसेच वाशीम शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन इमारत सिव्हिल लाईन्स परिसरात ९ एकर क्षेत्रावर उभारण्यात आली असून इयत्ता



पहिली ते बारावीपर्यंत एकूण ९६० विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची सुविधा देण्यासाठी ही इमारत सज्ज आहे.

सद्यस्थितीत इयत्ता पहिली ते दहावीचे ४८८ विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. शहरी गोंगाटापासून दूर असलेल्या या परिसरात शांत, सुसज्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त शिक्षण वातावरण विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले आहे. इमारतीमध्ये संगणक प्रयोगशाळा, वाचनालय, स्टेम लॅब, डिजिटल क्लासरूम्स अशा विविध अत्याधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. नवी शैक्षणिक धोरण लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अनुभवाधारित आणि तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण मिळावे या उद्देशाने ही अधोसंरचना उभारण्यात आली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह असून पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. ही इमारत केवळ भौतिक बांधकाम नाही, तर देशाच्या उज्वल भविष्यासाठी आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणात केले.

## नक्शा कार्यक्रमांतर्गत नगरपालिका हद्दीतील मिळकतीचे नगर भूमापन कामकाजाला सुरुवात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्रॅमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या "नक्शा" कार्यक्रमाची प्रायोगिक योजनेची अंमलबजावणी बुलढाणा नगर परिषदेच्या हद्दीत ३० जुलैपासून सुरु झाली आहे. त्यामुळे बुलढाणा नगर परिषदेच्या हद्दीतील सर्व नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन भूमी अभिलेख उप अधीक्षक व्ही. ए.सवडदकर यांनी दिली आहे.

स्थानिक नागरी स्वराज्य संस्था क्षेत्रातील मूळ व विस्तारीत क्षेत्रामधील जमिनींचे भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्याबाबत नक्शा हा कार्यक्रम केंद्र शासनाकडून एक वर्षाच्या प्रायोगिक तत्त्वावर बुलढाणा येथे पथदर्शी स्वरुपात राबविण्यात येत आहे. याअंतर्गत नगरपालिका हद्दीतील नगर भुमापन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी २९ जुलै रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. याकामी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाचे कर्मचारी तसेच प्युरवेज इंफ्रा प्रा.लि. नगरपालिका प्रतिनिधी मिळकतींला प्रत्यक्ष भेट देऊन ग्राऊंड ट्रुथिंग करणार आहे, अशी माहिती श्री. सवडदकर यांनी दिली.

नक्शा प्रकल्पाचा नागरिकांना होणारा लाभ: शहरी जमिनीचे ड्रोनच्या साहाय्याने अचूक आणि विस्तृत सर्वे क्षण, आधुनिक जीआयएस प्रणालीवर आधारित डिजीटल मिळकत नकाशांची निर्मिती, नागरिकांना ऑनलाइन डिजीटल मिळकत पत्रिका उपलब्ध होणार, ज्यामुळे मालमत्ता हक्कांचे संरक्षण व आर्थिक व्यवहारात पारदर्शकता निर्माण होईल, शासनाच्या विविध योजनांसाठी विकासोपयोगी जीआयएस नकाशांचा आधार, नागरी हक्कांचे संरक्षण आणि सुविधा योजनांचे अचूक नियोजन करता येईल.

### सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणात राज्य सरकारच आरोपी : प्रकाश आंबेडकर

**मुंबई/प्रतिनिधी :** पोलिसांच्या ताब्यात असलेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं संबंधित पोलिसावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करत मुंबई उच्च न्यायालयाला आव्हान दिलं. सर्वोच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवल्याची माहिती वंचितचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

ॲड. प्रकाश आंबेडकर माध्यमांशी बोलताना म्हणाले, '' खरेतर सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणात राज्य सरकारच आरोपी आहे. सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू हा कोठडीत झाला आहे. राज्य सरकारनं हात झटकून टाकण्याचा प्रयत्न केला. आम्ही ही बाब कोर्टाच्या निदर्शनाला आणून दिली आहे. पोलीस कोठडीतील मृत्यूबाबत उच्च न्यायालयानं काही नियम केले तर अनेकांना न्याय मिळेल. सेकंड ओपिनियन उच्च न्यायालयाच्या आदेशाशिवाय देता येत नाही. त्यामुळे जेजेमधील डॉक्टरांनादेखील आरोपी करण्यासाठी अर्ज करण्यात येणार आहे''.

## उद्योगांच्या सर्व परवानग्या आता मैत्री पोर्टलवर ऑनलाईन मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य हे उद्योग क्षेत्रांमुळे १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहे. त्यामुळे उद्योगांना पाणीपुरवठा, वीज, रस्ते व कनेक्टिव्हिटी, पर्यावरण मंजुरी, वन परवानग्या, मजूर कायदे, जमीनचे वाटप या सर्व सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिल्या पाहिजे. उद्योगधंद्यांना सर्व परवानग्या ऑनलाईन मिळाल्या पाहिजे, यासाठी मैत्री पोर्टल एकिकृत करून त्यावरच सर्व परवानग्या द्याव्यात. त्याचबरोबर, उद्योजकांना शासकीय विभागांसदर्भात काही अडचणी असतील, तर त्यासंदर्भात निनावी तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध विषयांशी संबंधित मुद्यांवर बैठक झाली. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्रि शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेशकुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, उद्योग विभागाचे सचिव डॉ.पी.अन्बळगन, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह यांच्यासह अन्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्योगांकरिता त्यांच्या मागणीप्रमाणे जलसंपदा विभागाने पाणी उपलब्ध करून द्यावे. माजलगाव, दिघी, बुटीबोरी, चामोर्शी (गडचिरोली), जयपूर (छत्रपती संभाजीनगर) आणि पीएम मित्रा (अमरावती) येथे वीज सबस्टेशनच्या उभारणी कामाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. उद्योगांसाठी वीज वहन आणि देखभालीच्या समस्यांसंदर्भात वेगळी व्यवस्था करण्यात यावी. पर्यावरण विभागाच्या सर्व परवानग्या मैत्री या पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करून द्याव्या. त्याचप्रमाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने शेंद्रा -बिडकीन मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यासंदर्भात कार्यवाही करावी नवीन उद्योगांनी बुटीबोरी



येथे जास्त पसंती दिली असल्याने या भागातील रोड कनेक्टिव्हिटी तात्काळ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

राज्यातील उद्योगांना कन्सेंट टू इस्टब्लिश व कन्सेंट टू ऑपरेट परवानग्या वेळेवर मिळाल्या पाहिजे, असे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, उद्योगांना लागणाऱ्या अनावश्यक परवानग्या बंद कराव्यात. उद्योग प्रतिनिधीच्या अनाहूत तपासण्या बंद कराव्यात. उद्योगांना जमीनी देण्यासंदर्भात निर्णय आणि परिपत्रक ते सुधारित करून एकत्रित करण्यात यावे. उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी,असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राच्या ज्या भागात एमआयडीसी आहेत, त्या भागाला औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यात यावा. औद्योगिक नगरीचा दर्जा दिल्यास दुहेरी करासारखी समस्या निकाली निघेल. उद्योगांना देण्यात येणार पात्रता प्रमाणपत्र ऑनलाईन देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनीच्या संपादनासंबंधी तसेच विविध औद्योगिक प्रकल्पासाठी सुरू असलेल्या व प्रस्तावित भूसंपादना प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.

CMYK

## महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी

आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्र्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकारांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

# लोणार धारातीर्थ भाविकांच्या अंघोळीसाठी, कावड जलस्त्रोतासाठी खुले करावे

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्याकडे मागणी

**दैनिक आपला विदर्भ**







**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथे असलेल्या धारातीर्थ गोमुख धारेखाली भाविकांना श्रावण मासानिमित्त कावड जलस्त्रोत घेऊन जाण्यासाठी आणि भाविकांना अंघोळ करण्यासाठी हे स्थळ खुलं करावं अशी मागणी केंद्रीय आयुष ,आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटक मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांच्याकडे केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे उल्कापातामुळे सरोवराची निर्मिती झाली आहे हे जगातील तिसरे खाऱ्या पाण्याचं सरोवर म्हणून त्याची ओळख आहे हे सरोवर बुलढाणा लोकसभा मतदारसंघांमध्ये येत असून जिल्ह्याच्या वैभवाच्या आणि धार्मिक अध्यात्मिक दृष्टिकोनातून महत्वपूर्ण आहे लोणार सरोवर परिसरामध्ये धारातीर्थ गोमुख ही भाविकांसाठी श्रद्धेचे ठिकाण आहे या गोमुखाततुन पडणाऱ्या पाण्याखाली अनेक भाविक श्रावण मासात अंघोळ करत असतात परंतु कोरोनाच्या काळामध्ये लागलेल्या निर्बंधमुळे या गोमुखा खाली अंघोळ करण्यास बंदी घालण्यात आली होती कोरोनाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर ही या गोमुखाच्या धारेखाली अंघोळ करण्यास मनाई करण्यात आलेली आहे अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हे गोमुख स्थळ श्रावण मासानिमित्त भाविकांच्या अंघोळीसाठी आणि जलस्त्रोत नेण्यासाठी खुलं करावं अशी मागणी पर्यटन सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांच्याकडे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आहे.

# द राजा साबच्या निर्मात्यांनी पोस्टर शेअर करुन संजय दत्तला दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा मुन्ना भाई उर्फ संजय दत्त आज, २९ जुलै रोजी त्याचा ६६वा वाढदिवस साजरा करत आहे. या खास प्रसंगी कुटुंब, मित्र आणि इंडस्ट्रीतील लोक त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. दरम्यान द राजा साबच्या निर्मात्यांनी त्यांच्या चित्रपटातील संजय दत्तचे नवीन पोस्टर रिलीज केले आहे आणि त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पोस्टरमध्ये संजू बाबाचा नवा लूक पाहून चाहते चित्रपटातील त्याची भूमिका पाहण्यास उत्सुक झाले आहेत. द राजा साब हा प्रभासचा आगामी मोठा चित्रपट आहे. मारुती दिग्दर्शित या हॉरर कॉमेडीमध्ये प्रभास महत्त्वाची भूमिका साकारत आहे. त्याच्याबरोबर निधी अग्रवाल, मालविका मोहनन आणि रिद्धी कुमार या अभिनेत्री देखील दिसणार आहेत.

संजय दत्तचा वाढदिवस : द राजा साब चित्रपटात बॉलिवूड अभिनेता संजय दत्त प्रभासच्या आजोबांची भूमिका साकारत आहे. मंगळवार, २९ जुलै रोजी संजू बाबाच्या वाढदिवसानिमित्त निर्मात्यांनी शेअर केलेल्या पोस्टरमध्ये तो एका वृद्ध व्यक्तीच्या भूमिकेत असल्याचा दिसत आहे. द राजा साब चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर संजय दत्तचे पोस्टर रिलीज करत कॅप्शनमध्ये लिहिलं, द राजा साब टीम, पॉवरहाऊस आणि बहु-प्रतिभावान संजू बाबांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. या ५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये एक भयानक उपस्थिती पाहण्यासाठी सज्ज व्हा जी तुम्हाला आतून हादरवून टाकेल.

संजय दत्तचे आगामी चित्रपट : मारुती दिग्दर्शित द राजा साब हा हॉरर कॉमेडी चित्रपट ५ डिसेंबर २०२५ रोजी अनेक भाषांमध्ये रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. यात प्रभास, संजय दत्त आणि बोमन इराणीसह असे अनेक कलाकार आहेत. या चित्रपटाला पीपल मीडिया फॅक्टरी निर्मित थमन यांनी संगीत दिलं आहे.द राजा साब व्यतिरिक्त, संजय दत्त टायगर श्रॉफच्या बागी ४ या ॲक्शन चित्रपटात दिसणार आहे. तसेच संजू बाबाकडे वेलकम टू द जंगल देखील आहे, ज्यामध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी, जॅकी श्रॉफ, अर्शद वारसी, परेश रावल, रवीना टंडन, लारा दत्ता, जॅकलिन फर्नांडिस, दिशा पटानी यासारख्या कलाकारांचा समावेश आहे.

## नांदणी मठाच्या हत्तीणीबाबत राजू शेट्टींचे जुने पत्र व्हायरल; राजू शेट्टींनी दिले स्पष्टीकरण



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील नांदणी मठातील महादेवी हत्तीणीला गुजरातला नेल्यानंतर माजी खासदार राजू शेट्टी यांचे एक जुने पत्र सध्या सोशल मीडियावरुन जोरदार व्हायरल होत आहे. २०१८ साली राजू शेट्टी यांनी ''हत्तीचे संगोपन व देखाभाल करणे कठीण आहे, त्यामुळे त्यांच्या मागणीनुसार हत्ती वनसंग्रालयाकडे सोडणेसाठी, सहकार्य करावे'' अशा आशयाचे मुख्य वन संरक्षक प्रादेशिक यांना विनंती करणारे हे पत्र आहे. मात्र या व्हायरल होणाऱ्या पत्राबाबत बोलताना राजू शेट्टी यांनी, सोशल मीडियावर जुन्या पत्राचा संदर्भ चुकीच्या अर्थाने घेतला जात स्पष्टीकरण दिले आहे. काही मंडळी राजकीय आकसापोटी जुने पत्र पुन्हा व्हायरल करत असल्याचा आरोप शेट्टींनी केला आहे.

## कुणाचाच राजीनामा होणार नाही - शशिकांत शिंदे



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** शरद पवार पक्षाचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचा आज कळंबोली या ठिकाणी भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी बोलताना त्यांनी राज्य सरकारवर टीका केली माणिकराव कोकाटेंचा सोडाच कोणाचाही राजीनामा होणार नाही. अशा प्रकारची खरमरीत टीका यावेळी त्यांनी राज्य सरकारवर बाबत बोलताना केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या संदर्भामध्ये आवाज उठवत आहे उठवत राहील अशा प्रकारचे भावना ही व्यक्त केली.

# ''आरोग्याचा संकल्प कावीळमुक्त जिल्ह्याची वाटचाल!''

### २८ जुलै रोजी राष्ट्रीय कावीळ दिनांनिमित्त जिल्ह्यात जनजागृती व तपासणी उपक्रम

**दैनिक आपला विदर्भ**



**वाशीम/प्रतिनिधी :** राष्ट्रीय कावीळ दिनानिमित्त २२ ते २८ जुलै दरम्यान जिल्ह्यात ''कावीळ साप्ताह'' साजरा करण्यात आला. या कालावधीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल कावरखे, अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, डॉ. अविनाश झरे तसेच डॉ. पराग राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आरोग्यवर्धक उपक्रम राबविण्यात आले.

कावीळ रोगासंदर्भातील प्रशिक्षण शिबिरात वैद्यकीय अधीक्षक व अधिकारी सहभागी झाले. यावेळी कावीळ नियंत्रण कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. अश्विन कुमार हाके यांनी मार्गदर्शन केले. कावीळ प्रतिबंध, लसीकरण व जनजागृतीबाबत डॉ.पराग राठोड यांनी सविस्तर माहिती दिली.तर, रवी भिसे यांनी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तपासणी शिबिरांचे आयोजन केले असल्याची माहिती दिली. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली अतिजोखीम गटातील व्यक्ती आणि कैद्यांची तपासणीही करण्यात आली. या शिबिरात तपासणीचे कार्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ लक्ष्मण शिंदे यांनी पार पाडले. दरम्यान, जिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोफत कावीळ तपासणी व लसीकरण करण्यात आले. याशिवाय शासकीय परिचर्या महाविद्यालयात पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये पल्लवी कांबळे, अचल काळपांडे, सुयश चव्हाण आणि कोमल सानप यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.या प्रसंगी प्राचार्या स्नेहल महाले, औषधी निर्माता भारती ढोरे व इतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी नागरिकांना जिल्हा रुग्णालयात येऊन मोफत तपासणी व उपचाराचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# वाशिम जिल्ह्यात संरक्षित युरिया साठा शेतकऱ्यांसाठी मुक्त; १४ विक्रेत्यांमार्फत वितरण

**दैनिक आपला विदर्भ**



**वाशीम/प्रतिनिधी :** खरीप हंगामात आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी दरवर्षीप्रमाणे जिल्ह्यात युरिया व डीएपी खताचा संरक्षित साठा कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यावर्षी वाशिम जिल्ह्यात युरिया खताचा ४२७.०५ मेट्रिक टन साठा राखून ठेवण्यात आला होता. याआधीच डीएपी खताचा संरक्षित साठा मुक्त करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यात युरिया खताचा तुटवडा जाणवत असल्याने, तसेच शेतकऱ्यांकडून युरियाची मागणी वाढल्यामुळे मा. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या निर्देशानुसार हा संपूर्ण युरिया साठा शेतकऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे.

हा साठा जिल्ह्यातील १४ अधिकृत कृषी निविष्ठा विक्रेत्यांमार्फत वितरित केला जात असून, यामध्ये मंगरुळपीर, रिसोड, वाशीम, कारंजा, मानोरा, मालेगाव या तालुक्यांचा समावेश आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना खत मिळावे यासाठी प्रति शेतकरी तीन ते चार गोण्या याप्रमाणे मर्यादा ठेवण्यात आली आहे. त्यामुळे त्यापेक्षा अधिक युरिया खतासाठी आग्रह न करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.शेतकऱ्यांनी त्यांच्या नजीकच्या वितरकाकडे जाऊन युरिया खत खरेदी करावे आणि आपल्या खरीप हंगामातील शेती कामांना गती द्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.

### वितरक व साठ्याचा तपशील

| क्र. | वितरकाचे नाव | तालुका | युरिया साठा (मे.टन) |
|---|---|---|---|
| १ | सती आई कृषी एजन्सी, शेल बाजार | मंगरुळपीर | ३५.१० |
| २ | बालाजी कृषी सेवा केंद्र, कवठा | रिसोड | ३२.१० |
| ३ | अग्रवाल ट्रेडर्स, अनसिंग | वाशिम | ५०.४० |
| ४ | टी.के. जैन, वाशीम | वाशीम | ४४.५५ |
| ५ | ठाकरे कृषी सेवा केंद्र | मंगरुळपीर | ५८.०० |
| ६ | मंगरुळपीर सोसायटी | मंगरुळपीर | २९.५५ |
| ७ | लहाळे कृषी सेवा केंद्र | कारंजा | २४.०७५ |
| ८ | माऊली एग्रो एजन्सी | मानोरा | २०.२५ |
| ९ | बनगिनवार एग्रो एजन्सी | मानोरा | २०.०२५ |
| १० | मुंडे ट्रेडर्स | रिसोड | ४०.५० |
| ११ | किसान कृषी सेवा केंद्र | मालेगाव | २०.२५ |
| १२ | कृषी विकास केंद्र, शेल बाजार | मंगरुळपीर | १५.३० |
| १३ | राजश्री ट्रेडर्स, अनसिंग | वाशिम | १८.४० |
| १४ | कारंजा सोसायटी | कारंजा | २०.२५ |

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# संक्षिप्त...

## कोयता आणि सत्तुरचा धाक दाखवून व्हिडिओ व्हायरल; ४ जणांविरोधात गुन्हा दाखल




दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमध्ये कोयता आणि सत्तूरने एका तरुणाला आधी धमकावण्यात आले. नंतर त्याच्यावर हल्ला करून गंभीर जखमी केले. विशेष म्हणजे या मारहाणीचा व्हिडिओही तयार करण्यात आला. जो सोशल माध्यमावर व्हायरल करण्यात आला. जखमी तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून एकाला अटक करण्यात आली आहे. शेख अलीम अनिस असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो बीड शहरातील तेलगाव नाका परिसरात राहतो. २४ जुलै रोजी रात्री ४ जणांच्या टोळक्याने त्याला तेलगाव नाका परिसरातच गाठले. कोयता आणि सत्तूरची धमकी देत त्याचा व्हिडिओ काढला. त्यानंतर शिवीगाळ करून कोयता आणि सत्तूरने मारहाण केली. यात अलीमच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी त्याला आधी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. नंतर कुटुंबीयांनी त्याला एका खासगी रुग्णालयात दाखल केले. त्याच्या हातावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या प्रकरणी शहेबाज अब्बास पठाण, शेख आदिल शेख मुजीब, शेख नुमान आणि अन्य एका विरुद्ध पेठबीड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

## भारतीय खेळाडूंच्या यशावर तरी राजकारण करु नये - राम कुलकर्णी



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** संसदेतील घडामोडीवरून पुन्हा एकदा भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी इंडिया आघाडीवर टीकास्त्र सोडले आहे. आज इंडिया आघाडीच्या खासदारांचा देश विरोधी चेहरा उघडा पडला आहे. किमान भारतीय खेळाडूंच्या यशावर तरी राजकारण करू नये, असं म्हणत भाजपचे राज्याचे प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी टीकास्त्र सोडले आहे. यावेळी ते म्हणाले, की बुध्दीबळ पटू दिव्या देशमुखांच्या अभिनंदनाचा ठराव देशाच्या संसदेत सभापती ओम बिरला यांनी मांडला, तेव्हा सत्ताधारी बाकावर टाळ्यांचा पाउस पडला. मात्र विरोधकांनी टाळ्या वाजवणे बाजुला, त्यांच्यात स्मशान शांतता पसरली. टाळ्या वाजवा सभापतींना सांगाव लागणे हे दुर्दैव आहे. उठसुठ मोदींना विरोध करताना इंडिया आघाडी खासदार देश विरोधक झाली, हा चेहरा उघडा पडला. भारतीय खेळाडूंच्या यशावर तरी राजकारण करू नये, असं भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी म्हटलं आहे.

## मंगरुळपीर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मंगरूळपीर/प्रतिनिधी :** येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक परिसरात १ ऑगस्ट रोजी सकाळी साडे अकरा वाजता साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुखदेवराव झोंबाळे तर, मुख्य अतिथी म्हणून आ.शाम खोडे हे राहतील.तसेच सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाकधणे , माजी पंचायत समिती सभापती भास्कर पाटील शेगीकर,पांडुरंग कोठाळे, संजय वैरागडे, डॉ.रमेश चंदनशिव, विनोद जोगदंड, अनिल कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहील. कार्यक्रमात प्रबोधनकार बेबीताई कांबळे यांचा गीत गायन कार्यक्रम संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाला समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त तथा अध्यक्ष अण्णाभाऊ साठे स्मारक समिती भगवानराव पिसोळे यांनी केले आहे.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

### मुंगळा येथील शेतकऱ्यांची जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ




**मालेगाव/प्रतिनिधी :** तालुक्यातील मुंगळा परिसरात मागील तीन वर्षांपासून वेळोवेळी आलेल्या पावसामुळे संत्रा उत्पादक अडचणीत सापडला आहे. मागील वर्षी मे महिन्यात सतत पाऊस सुरू असल्यामुळे मृगबहाराला फटका बसला. यामुळे मुंगळा येथील संत्रा उत्पादक शेतकरी अडचणी सापडला असून शासनाने संत्रा उत्पादक शेतकयांना नुकसान भरपाई देण्यात यावी,अशी मागणी मुंगळा येथील जगदंबा बचत गटाच्या शेतकयांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद केले आहे की, मुंगळा परिसरात जवळपास ६०० ते ७०० हेक्टर संत्रा लागवड असून मुंगळा येथील शेतकयाचे संत्रा हे मुख्य पीक आहे व संत्रा बहार निसर्गावर अवलंबून असून केव्हा निसर्ग शेतकयांच्या मुळावर घाव घालेल याला सांगता येत नाही. असाच प्रकार मुंगळा येथील संत्रा उत्पादकाचा झाला आहे. नुकतेच संत्राचे उन्हाळी पाणी बंद करून संत्रा बागा में महिन्यात तानावर सोडल्या होत्या. परंतु, मागील तीन वर्षांपासून वेळेअवेळी आलेल्या पावसाचा फटका मृग बहाराला बसत आहे. तसेच यावर्षी में महिन्यात सतत १ महिना संतत पाऊस सुरू होता. यामुळेच संत्रा मृग बहाराला बसला असून येथील तसेच तालुक्यातील सर्व संत्रा उत्पादक अडचणीत सापडला आहे. तरी शासनाने संत्रा उत्पादक शेतकयाला आर्थिक मदत देण्यात यावी,अशी मागणी जगदंबा कृषी बचत गटाच्या शेतकयांच्या वतीने आमदार अमित झनक तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन देतावेळी जगदंबा बचत गटाचे शेतकरी प्रकाश राऊत, गजानन केळे, अनंद नाईक, जनार्दन जायभाये, संदिप बोबडे, भागवत मोहळे, संतोष बबन राऊत, सिदेश्वर केळे तसेच शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## आता टपाल कार्यालयात एपीटी अप्लीकेशन या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी

**वाशीम/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागाच्या इतिहासात नव्या युगाचा आरंभ होत आहे. काळाच्या ओघातही विश्वासाने चालत आलेल्या पोस्टाच्या सेवेने आता आधुनिकतेकडे झेप घेतली आहे. आयटी २.० या परिवर्तनशील उपक्रमांतर्गत, एपीटी अप्लीकेशन या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी वाशीम जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालयांमध्ये ४ ऑगस्ट २०२५ पासून सुरु होत आहे.

ही केवळ प्रणाली नव्हे, तर ग्राहकांशी असलेल्या नात्याचा आधुनिक पुन्हा धागा आहे. पारंपरिक टपाल व्यवस्थेपासून आजच्या डिजिटल युगात प्रवेश करत, सेवा आणखी जलद, अचूक आणि पारदर्शक होणार आहेत.मात्र या बदलासाठी २ ऑगस्ट रोजी सर्व व्यवहार बंद ठेवावे लागणार आहेत. ही तात्पुरती गैरसोय पण उज्वल उद्याची नांदी आहे.डाक विभागाचे प्रवर अधीक्षक यांनी दिलेल्या माहितीनुसार रक्षाबंधनाच्या काळात राख्यांचे टपाल वेळेत पोहोचावे म्हणून अंमलबजावणीची तारीख ५ ऑगस्ट ऐवजी ४ ऑगस्ट करण्यात आली आहे.ही योजना म्हणजे एका परंपरेचा आधुनिक स्पर्श आहे जुन्या पाकिटात नवीन आशय, ज्यामुळे दूरवरच्या नात्यांनाही डिजिटल वेग लाभणार आहे.असे डाक विभागाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## शेलूबाजार येथे शिव गणेश मंडळाची कावड यात्रा उत्साहात

दैनिक आपला विदर्भ

**मंगरूळपीर/प्रतिनिधी :** शेलूबाजार येथे श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारनिमित्त शिव गणेश मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने पारंपरिक कावड यात्रा मोठ्या भक्तिभाव, जल्लोष व वाद्यगजरासह संपन्न झाली. शेलूबाजार येथून येडशी (कुंड) येथे पायदळ कावड यात्रा काढण्यात आली. परतीच्या प्रवासानंतर गावात कावड रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. या यात्रेत स्त्री-पुरुष, बालगोपाळ, युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी कावड रथाचे पूजन करण्यात आले. ''हर हर महादेव'' व ''जय श्रीराम'' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यात्रेचे खास आकर्षण ठरले ते भगवान शंकराच्या वेशातील चिमुकले वंशु अपूर्वा व इतर बालकांनी परिधान केलेली वेशभूषा उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून गेली. स्थानिक चौकात कावड यात्रेच्या स्वागत प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून आमदार श्याम खोडे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून शिव गणेश मंडळाचे कौतुक करत, ही यात्रा भक्ती, परिश्रम आणि संस्कृतीचा उत्तम संगम आहे असे सांगितले. या यात्रेत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, पांडुरंग कोठाळे, सुनिल मालपाणी, अनिल काटकर, गोविंदा भेराने, दौलतराव इंगोले, बाबाराव पवार, सुरेंद्र राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे यात्रेचा उत्साह आणखीनच वाढला. यावेळी सुदर्शन धोटे, सचिन डोफेकर, नंदकिशोर लांभाडे, अनिश कर्नावट, कैलास जाजू, रवि लांभाडे, मोहित कर्नावट, संजय हापसे, गणेश बोबडे, शरद बोबडे, आदित्य कोसे, आनंद दिनोदे, रामेश्वर महामूने, प्रसाद केचकर, विशाल खंडारे, सतीश राऊत, जितु ढोरे, रोहित तोलंबिया आदी उपस्थित होते.यात्रेदरम्यान वाहतूक व्यवस्था नीटपणे हाताळण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक शुभांगी थोरात आणि चौकीतील पोलीस कर्मचारी यांनी योग्य नियोजन केले. या भक्तिमय कावड यात्रेमुळे शेलूबाजार परिसरात धार्मिकता, सामाजिक एकोपा व संस्कृतीचे सुंदर दर्शन घडले.

## वत्सगुल्म शेतकरी संवाद तहसील कार्यालयात उत्साहात पार



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम :** शेतकऱ्यांच्या विविध अडचणींना थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी ''वत्सगुल्म शेतकरी संवाद'' हा उपक्रम तहसील कार्यालयात संपन्न झाला. हा संवाद शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील दुवा ठरला. पाण्याचे हक्क, पाट व्यवस्थापन, शेतरस्ते, सातबारा दुरुस्ती, वीजजोडणी, खतांची टंचाई यांसारख्या प्रश्नांवर शेतकऱ्यांनी थेट आपले मत मांडले. या चर्चासत्रात प्रशासनाच्या विविध विभागांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या संवादास उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर, पोलिस विभागाच्या वतीने चौरे व गंधे आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले व शक्य त्या तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना ऐकण्याचा आणि त्यांच्यासोबत थेट संवाद साधण्याचा हा प्रयत्न शेतकऱ्यांच्या मनात आश्वासक विश्वास निर्माण करणारा ठरला. संवादाच्या शेवटी काही तक्रारींवर कार्यवाहीही करण्यात आली.शासन शेतकऱ्यांच्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारा आणि प्रशासन-शेतकरी संबंध अधिक दृढ करणारा वत्सगुल्म शेतकरी संवाद उपक्रम कौतुकास्पद ठरतो आहे.

## वनउमरी गावात अज्ञात रोगाचा फैलाव

### सहा जनावरे दगावली : पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**मानोरा/प्रतिनिधी :** तालुक्यातील उमरी खुर्द गट ग्रामपंचायत मधील वन उमरी ( रंगपटी ) या गावात जनावरांमध्ये अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सहा जनावरांचा मृत्यू झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून रोगाची लागण झाल्याने गाई, वासरे व बैल आजारी पडत असून, काही जनावरांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन तात्काळ उपाययोजना करून अज्ञात रोगावर नियंत्रण मिळवावे, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

गावात सुमारे २५० हून अधिक जनावरे असून, येथील बहुतांश नागरिक गाई व म्हशी पाळून आपला उदरनिर्वाह चालवीत आहे. अचानक अज्ञात रोगाचा फैलाव झाल्याने सहा जनावरे दगावल्यामुळे पशुपालकांचे मोठे नुकसान झाले आहे.येथील आकाश राठोड यांची एक गाय, रामचंद्र चव्हाण यांचा एक बैल, काशीराम हळके यांची एक गाई व इतर तीन जनावरे अज्ञात रोगाचे लागणीतून मृत्यूमुखी पडली आहेत. मृत जनावरांची संख्या एकूण सहावर पोहोचली आहे.

दरम्यान, या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता, वाशीम येथून लस आणण्यात आली असून, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रोम यांच्या नेतृत्वाखालील चमू वन उमरी गावात पोहोचली आहे. त्यांनी आजारग्रस्त जनावरांवर उपचार सुरू केले असून, इतर जनावरांना प्रतिबंधात्मक लस टोचण्याचे काम हाती घेतले आहे. डॉ. रोम यांनी सांगितले की, ''सध्या गावात उपचार सुरू असून, रोग पसरू नये, यासाठी खबरदारी घेतली जात आहे. सर्व पशुपालकांनी सतर्क राहून जनावरांमध्ये कोणताही त्रास दिसताच त्वरित माहिती द्यावी.या घटनेमुळे वन उमरी गावात भीतीचे वातावरण पसरले असून, रोग आटोक्यात आणण्यासाठी प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

### पशुवैद्यकीय विभागाचा निष्काळजीपणा

''पशुवैद्यकीय विभागाने वेळेवर प्रतिबंधात्मक लस उपलब्ध करून दिली असती, तर आज ही वेळ आली नसती. आम्ही वेळोवेळी तक्रार केली, पण कोणीही आमच्या मागणीकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे गावात अज्ञात रोगाचा फायदा झाला आहे. याला संबंधीत पशु वैद्यकीय विभाग कारणीभूत आहे.असा आरोप पशुपालक साहेबराव राठोड यांनी प्रतिक्रिया देताना केला आहे.

# नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग राबविते गेल्या दहा वर्षापासून स्वच्छतेचा अनोखा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** दूसरबीड दिनांक २४ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय योजना विभागाच्या अंतर्गत नारायणराव नागरे महाविद्यालय मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट कार्यरत आहे या विभागाच्या माध्यमातून विविध स्वरूपाचे समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा चे सचिव शिवराज कायंदे हे संत गजानन महाराज शेगावचे भक्त असल्याने त्यांच्या कल्पनेतून स्वच्छतेचा संदेश देण्याकरिता नारायणराव नागरे महाविद्यालयातील कर्तव्यदक्ष प्राचार्य तथा राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी तसेच आधी सभा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉक्टर विजय नागरे हे संत गजानन महाराज यांच्या दिंडी परतीचा प्रवास सिंदखेड राजा किनगाव राजा दुसर बीड लोणार या मार्गाने जाते महाविद्यालयाच्या वतीने तढेगाव फाटा ते नगर माळ या चार किलोमीटर अंतरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भाविक भक्त दर्शना करीता येत असतात त्यामुळे प्लॅस्टिक कागद कचरा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पडतात ते स्वच्छ करण्याकरिता संस्थेचे सचिव व त्यांच्या सौभाग्यवती प्रा. धनश्री कायंदे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने या स्वच्छतेच्या मोहिमेमध्ये सहभागी होतात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा प्राचार्य यांना स्वच्छते विषयी विचारले असता त्यांनी सांगितले की आम्ही महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व समाजाला स्वच्छतेचा संदेश देण्याकरिता हा उपक्रम राबवित असतो तसेच महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने स्थानिक दुसरबीड आठवडी बाजार भरत असल्याने त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात




कागद प्लॅस्टिक कचरा पडतो तो सुद्धा उचलण्याचे व त्याचे निर्मूलन करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करतात या उपक्रमामध्ये डॉगणेश घुगे डॉ. दीपक देशमाने प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. नयना गवारे प्रा.गजानन राठोड प्रा. देवानंद नागरे प्रा.महेश कायंदे प्रा.जगदीश यादव गजानन मुंडे अनिल रणबळे तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पिंपरी फॉरेस्ट येथील जुगार अड्ड्यावर धाड

## ८.५ लाखांचा मुद्देमाल जप्त : ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**कारंजा/प्रतिनिधी :** येथील ग्रामीण पोलिस स्टेशन हद्दीतील पिंपरी फॉरेस्ट परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा वाशीमच्या पथकाने २८ जुलै रोजी रात्री धाड टाकून ८ लाख ५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

प्राप्त माहितीनुसार वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पिंपरी फॉरेस्ट येथे जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिंपरी फॉरेस्ट येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावरील कारवाई करून नगदी २ लाख ६०० रुपये, १ लाख ७० हजार रुपये किमतीचे ९ मोबाईल , ५ मोटरसायकल व ६ लाख १५ हजार रुपये किमतीचे एक चारचाकी वाहन , तसेच ५२ तास पत्ते असा एकूण ८ लाख ५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी कारंजा शहरातील व परिसरातील ९ जणांविरुद्ध कारंजा ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शिंदे यांच्या मार्गदर्शनात मनोज गोफने करीत आहे.





### कारंजा तालुक्यात १४ दिवसात दुसरी कारवाई

वाशीम गुन्हे शाखेच्या शिलेदारांनी कारंजा तालुक्यात १४ दिवसात दोन ठिकाणी धाड टाकून लाखोंच्या मुद्देमालासह १६ आरोपींवर गुन्हा दाखल केला.यातील पहिली कारवाई काजळेश्वर येथे १४ जुलै रोजी करण्यात आली होती. यावेळी ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून १.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.वाशीम गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळेच ठाणेदार खंडारे यांची बदली झाल्याची चर्चा परिसरात रंगली होती. तर, दुसरी कारवाई २८ जुलै रोजी पिंपरी फॉरेस्ट येथे करण्यात आली.एकीकडे कारंजा ग्रामीण पोलिस स्टेशन हद्दीत एवढ्या मोठ्या प्रमाणात जुगार अड्डे सुरू असताना ग्रामीण पोलिसांना त्याबद्दल माहिती नसल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.तर दुसरीकडे ग्रामीण पोलिस स्टेशन हद्दीत वाशीम गुन्हे शाखेच्या पोलिसांना कारवाई करावी लागत असल्याने ग्रामीण पोलिसांच्या कर्तव्यावर देखील प्रश्नचिन्ह निर्माण केल्या जात आहे.

---

## विविध वृत्त...

### भाजपा सोबत युती करणे ही भूतकाळातील सर्वात मोठी चूक असल्याचे मत महादेव जानकर यांनी केले व्यक्त



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** भाजपा सोबत युती करणे ही भूतकाळातीर सर्वात मोठी चूक असल्याचं मत राष्ट्रीय समाज पक्षाचे (रासप) अध्यक्ष महादेव जानकर यांनी व्यक्त केल आहे. ते अकोल्यात बोलत होते. तर जानकर पक्षाच्या एका बैठकीसाठी अकोल्यात आले होते तर यावेळी बोलताना त्यांनी भाजपवर जोरदार प्रहार केला आहे. भाजपाला पराभूत करण्यासाठी भाजप सोडून कोणाशीही युती करण्यासाठी आपण तयार असल्याच जानकर म्हणालेत. तर आता भाजपची काँग्रेस झाल्याचंही ते जानकर म्हणतात. इतर पक्षातील बदनाम आणि भ्रष्टाचारी नेत्यांना दबाव टाकून आपल्या पक्षात आणायचे आणि पक्ष मोठा करायचा असं भाजपचे धोरण असल्याचे ते म्हणालेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्ष जिथे शक्य झालं तिथे काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, मनसे किंवा शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी आघाडी करणार असल्याचे ते म्हणालेत. तर ज्या ठिकाणी आघाडी होणार नाही. त्या ठिकाणी पक्ष स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केल आहे. भाजपला पराभूत करण्यासाठी भविष्यात राजू शेट्टी, बच्चू कडू, शेतकरी कामगार पक्ष यांसह रविकांत तुपकरांना सोबत घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं जानकर म्हणालेत. २०२९ मध्ये लोकसभा लढणार असून यापुढे केंद्राच्याच राजकारणात राहणार असल्याचे ते म्हणाले आहेत. यापुढे केंद्रातच मंत्री होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### अपघातात युवक जखमी कारंजा-मूर्तिजापूर मार्गावरील घटना

दैनिक आपला विदर्भ

**कारंजा/प्रतिनिधी :** रस्ता अपघातात एक युवक जखमी झाल्याची घटना कारंजा –मूर्तिजापूर मार्गावरील रिद्धी सिद्धी मंगलम जवळ मंगळवारी २९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता च्या दरम्यान घडली. सोवन राठोड वय १९ असे या अपघातात जखमी झालेल्या युवकाचे नाव असून तो राजस्थानमधील रहिवासी आहे. प्राप्त माहितीनुसार सोवन राठोड रस्त्याने प्रवास करीत असताना त्याला अपघात झाला आणि त्यात तो जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान त्याची प्रकृती गंभीर असल्याचे निदर्शनास आल्याने त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात आहे.

### अर्णव पानभरेची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड

दैनिक आपला विदर्भ

**मंगरूळपीर/प्रतिनिधी :** वाशीम येथील हॅपी पॅसेसद कन्सेप्ट स्कूल येथे नुकत्याच पार पडलेल्या वाशीम जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये मंगरूळपीर तालुक्यातील शेलूबाजार येथील अर्णव हिम्मत पानभरे याने उत्तम कामगिरी करत वयोगट १० ते १४ वर्षे (मुले) या गटामध्ये द्वितीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल प्राप्त केले आहे.या उत्कृष्ट कामगिरीमुळे अर्णव पानभरेची निवड राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी झाली असून त्याच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्याला या यशासाठी सुपखेला येथील सैनिक शाळेच्या शिक्षकांचे व पालकांचे मार्गदर्शन लाभले आहे.योगाचे महत्त्व लहान वयातच उमगून सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर अर्णवने हे यश मिळवले आहे. आता तो राज्यस्तरीय स्पर्धेत वाशीम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

### वाशीम येथे व्यसनमुक्ती रॅली

**वाशीम/प्रतिनिधी :** आजच्या काळात कळत नकळतपणे तरुण पिढी ड्रग गुटखा, दारू अशा नाना प्रकारच्या व्यसनाच्या आहारी जात आहे.



अशा तरुण पिढीला चांगल्या मार्गावर आणण्यासाठी तसेच त्यांच्या नवचैतन्य निर्माण करण्यासाठी वाशीम जिल्ह्यात समीर वानखेडे विचार मंच वतीने केतन माळेकर व इस्माईल खान पठाण यांच्या नेतृत्वात व्यसन मुक्ती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर रॅलीला प्रमुख उपस्थिती म्हणून अधिकारी समीर वानखेडे व सिने अभिनेत्री क्रांती रेडकर (वानखेडे) उपस्थित राहणार आहेत.

सदर रॅली ही ९ आगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकूल येथून कलेक्टर आफिस इथपर्यंत काढण्यात येणार आहे. सदर रॅलीत तरुण व तरुणींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन समीर वानखेडे विचार मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## जागतिक काविळ दिनानिमित्त जनजागृती रॅली

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक काविळ दिनानिमित्त आरोग्य विभाग, बुलढाणा यांच्या वतीने आज शहरात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली उत्साहात पार पडली.

रॅलीच्या वेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. घोंगटे, बाह्य रुग्ण विभाग प्रमुख, काविळ नियंत्रण कार्यक्रम प्रमुख, रक्त संक्रमण अधिकारी, आर.बी.एस.के. समन्वयक, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा, आयसीयू, एन.व्ही.एच.सी.पी., तसेच जिल्हा एड्स नियंत्रण विभाग व परिचर्या केंद्राचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या रॅलीत जिल्हा रुग्णालयातील नर्सिंग केंद्राचे अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. नर्सिंग प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य खेडेकर यांनी रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

---

## रेड रिबन मॅराथॉन: युवाशक्तीच्या पावलांनी आरोग्यजागृतीचा ध्यास




दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमीत्त २८ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय वाशीम शहरातुन एचआयव्ही/एड्स जनजागृतीकरीता मॅराथॉन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.

ही मॅराथॉन स्पर्धे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा घेण्यात आली. दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी हरण, दिलीप देवीसींग चव्हाण (वाहतूक पोलीस निरीक्षक, शहर वाशिम), जिल्हा अथलेटीक असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. बाळासाहेब गोटे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मॅराथॉन स्पर्धेला हिरवी झेंडी देऊन सुरुवात करण्यात आली. दरम्यान डॉ. रवि घुगे यांचीही उपस्थिती होती. मॅरॉथॉन स्पर्धे चा शुभारंभ जिल्हा रुग्णालय वाशीम येथे करण्यात आला व शहरातील मॅराथॉन स्पर्धेचे जिल्हा रुग्णालय वाशीम डॉ. देशमुख यांच्या दवाखाना, बस स्टॅण्ड,अकोला रोड - जिल्हा रुग्णालय वाशीम येथे समारोप करण्यात आला. दरम्यान रेड रिबन वरिष्ठ,कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्यानंतर स्पर्धेत सहभागी युवक आणि युवतींमध्ये प्रथम क्रमांक नंदकिशोर वानखेडे, द्वितीय क्रमांक अतुल पवार, तृतीय क्रमांक गणेश सावके यांनी पटकावले. महिला गटामध्ये प्रथम क्रमांक रुतीका नंदेवार, द्वितीय क्रमांक स्नेहा चौधरी, तृतीय क्रमांक नंदिनी वादखेडे यांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले.या स्पर्धकांची राज्यस्तरावर निवड करण्यात आली असून राज्यस्तरावरही ते चमकदार कामगिरी करणार आहेत. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश झरे यांच्या हस्ते मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.या स्पर्धेमध्ये श्री. सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना वाशीमचे प्रा. वाघ , प्रा. लांजेवार (गोटे महाविद्यालय), रामराव झनक महाविद्यालय मालेगावचे डॉ. दीपक जमधाडे सर, गुणवंत शिक्षण संस्था, ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मॅराथॉन पायलट समूह तसेच पोलीस प्रशासन व वाहतूक शाखा, जिल्हा रुग्णालयातील अम्बुलन्स टीमचे उत्तम सहकार्य लाभले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा पर्यवेक्षक रवि भिसे आणि आयसीटीसी विभागाचे समुपदेशक पंढरी देवळे, समुपदेशक विनोद रत्नपारखी, एसआरटीआय समुपदेशक मिलिंद घुगे, आयसीटीसीच्या प्रतिभा अवचार, बाबाराव भगत, निलेश अल्लाडा, राजू मेसरे, अनिल राठोड, स्वप्नील सरनाईक, रामेश्वर सरकटे, प्रशांत सुर्या यांनी परिश्रम घेतले.

---

## अवयवदान चळवळ म्हणून राबवा

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

### दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यात अवयवदान पंधरवडा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढवून अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी राज्यभरात दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान ‘‘अवयवदान पंधरवडा‘‘ उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी व्यापक जनजागृती आणि समाजाभिमुख मोहिम राबवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय नियोजन बैठकीत दिले.



या बैठकीत आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर, आरोग्य सेवा आयुक्त व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संचालिका डॉ. कादंबरी बलकवडे, केईएम रुग्णालयाचे डॉ. आकाश शुक्ला, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, ‘‘अवयवदान ही एक वैयक्तिक कृती नसून, ती सामाजिक बांधिलकी आहे. ही चळवळ जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारी आणि भीती दूर करणारी असली पाहिजे. लोकांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे.‘‘ राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि आरोग्य संस्थांमध्ये या मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरावर अवयवदात्यांचा गौरव करून मोहिमेला प्रेरणादायी स्वरूप द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

अवयवदानाच्या प्रक्रियेबाबत जनतेमध्ये असलेले गैरसमज, भीती व अंधश्रद्धा दूर करून, याबाबतचे वैज्ञानिक आणि वैद्यकीय आधार स्पष्ट करण्यावर भर देण्यात येईल. यामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. अवयवदानास प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांना, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्या (/) यांना या कालावधीत विशेष मार्गदर्शन दिले जाईल. प्रत्येक आरोग्य यंत्रणेकडून मोहिमेचा नियमित आढावा घेण्यात येणार असून राज्याला अवयवदानात आघाडीवर नेणे हे अंतिम उद्दिष्ट असल्याचे श्री. आबिटकर यांनी स्पष्ट केले.

या पंधरवड्यात विविध माध्यमांतून प्रचार व प्रसार, जनजागृती रॅली, चर्चासत्रे, हेल्थ टॉक्स, अवयवदात्यांचे अनुभव कथन यांचे आयोजन करण्यात येणार असून राज्य शासनाने हे पाऊल जनतेच्या सक्रिय सहभागाने यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

---

## दोषीवर कारवाई करुन न्याय द्या ; अन्यथा अन्नत्याग आंदोलन

### गणेश मवाळ यांचा उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या निष्काळजी पणामुळे विद्युत शॉक लागून कायम स्वरुपी अपंगत्व आले आहे. त्यामुळे संबधित विभागावर व अवैद्य विद्युत चोरणाऱ्यांवर कार्यवाही करून न्याय द्यावा, अन्यथा पेनटाकळी प्रकल्पाच्या कासारखेड येथे बेमुदत अन्नत्यात आंदोलन करण्यात येईल. असा इशारा मेहकर तालुक्यातील कासारखेड येथील गणेश रमेश मवाळ यांनी मेहकर उपविभागीय अभियंता व विद्युत मंडळाचे अभियंता यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, कासारखेड येथून जुने गावठाण येथे येतांना उच्चदाब वाहिनीचा विद्युत शॉक लागला. मी पिकप गाडीमध्ये एकटा असल्या कारणाने मोठा अनर्थ टळला. करंट लागण्याचे कारण रोडच्या बाजूला असलेले म्हसोबा डीपीवर अज्ञात शेतकऱ्यांनी उच्चदाब वाहिनीवरून अनधिकृत रित्या सपलाय रोड क्रॉस करून केबल व्दारे घेण्यात आला होता. केबल लॉबलेला असल्या कारणामुळे गाडीला त्याचा स्पर्श होऊन मला उच्चदाब वाहिनीचा करंट लागला व त्या मध्ये मी गाडीच्या खाली उतरत असताना मी खाली कोसळलो व माझ्या शरीराला अनेक ठिकाणी इजा झाल्या व गाडीचे चारही टायर जळून खाक झाले सदर घटना २४ जुलै २०२४ रोजी घडलेली आहे. गेले. सदर घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पसरली असता संबधित दशक्रीयेच्या विधी साठी आलेल्या घरातील व्यक्तींनी घटनेकडे धाव घेतली. कासारखेड येथून जुने गावठाण येथे जात असतांना हा प्रकार घडला असता मोठ्या प्रमाणात अनेक कुटुंब उध्दवस्त झाले असते. सदर घटना २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान सायंकाळी सदर घटना घडली असून सदर विभागाकडून आपल्या सोयीनुसार पंचनामा ७ मे २०२४ रोजी करून घटनेमध्ये सत्यता दाखवून ठेवण्यात आली नाही. मला मोठ्या प्रमाणात इजा झाल्यामुळे मला मेहकर येथे डॉ. कुळसुंदर यांच्या दवाखान्यात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून छत्रपती संभाजी नगर येथे बेबडे याच्या दवाखान्यात नेण्यात आले. २४ एप्रिल २०२४ ला उपचारासाठी भरती करून उपचार सुरु असतांना त्यामध्ये माझे दोन्हीही पाय जास्त प्रमाणात जळालेले असल्या कारणाने दोन्हीही पाय कापावे लागले.

त्यानंतर माझ्या पाठीच्या डाव्या बाजूला भाजले असल्या कारणामुळे बेबडे यांच्या दवाखान्यातून २९ एप्रिल २०२४ ला मला मुंबई येथे पुढील उपचारासाठी नेण्यात आले. ३० एप्रिल २०२४ ला मला मुंबई येथे अनेक शस्त्रक्रिया करुन माझा जिव वाचवण्यात आला व मला दवाखान्याणून पूर्णतःह बरा होण्यासाठी १२ महिने मरणाशी झुंज



जावी लागली. त्यानंतर पूर्णपणे बरा झाल्या नंतर मला २ एप्रिल २०२५ रोजी मला तेथून सुट्टी करण्यात आला. पण मला त्यामध्ये कायमस्वरूपी अपंगत्व माल्यामुळे जीवन व्यर्थ झाले आहे. संबंधित सदर घटनेचा संबंधित विभागाने अजून कुठल्याही प्रकारचा पाठपुरावा केला नाही व झाला ही नाही.

सदर घटनेच्या निषेद्धार्थ मी जानेफळ पोलीस स्टेशन ला तकार दाखल करण्यासाठी गेलो अरुला सदर घटनेची दखल घेऊन माझी तक्रार दाखल करून घेण्यात आली नाही. तरी संबंधित महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांनी अवैध्यरीत्या विद्युत पुरावा चोरणाऱ्यावर योग्य ती कारवाई करून मला न्याय द्यावा.याबाबत अनेक वेळा लाईन चोरीच्या तक्रारी होऊनही संबंधित विभागाने यावर दूर्लक्ष करत असल्यामुळे दिवसेंदिवस विद्युत पुरवठा चोरणाऱ्यांचे आत्मबल वाढत गेलेव संबधित विभागाच्या निष्काळजी पणामुळे मला बळी पडावे लागले. संबंधित विभागाने या घटनेची दखल न घेतल्यामुळे आजपर्यंत मला कुठल्याही प्रकारची शासकीय मदत झालेली नाही.तरी म. रा. वि. म. यांच्या निष्काळजी पणामुळे माझे जिवन व्यर्थ झाले असून संबधित विभागावर व अवैद्य विद्युत चोरणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करून न्याय द्यावा, अन्यथा पेनटाकळी प्रकल्पामध्ये जुने गावठाण कासारखेड येथे अन्नत्याग उपोषण करण्यात येईल असा इशारा गणेश मवाळ यांनी उपविभागीय अधिकारी व विद्युत वितरण कंपनीचे अभियंता यांना निवेदनाद्वारे दिला आहे.